# "महाराष्ट्रातील बदलते राजकारण"

**प्रा.छाया भारत सकटे** राज्यशास्त्र विभाग शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद sakatecb@gmail.com 9764864886

---

**गोषवारा:-** स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणाचा आणि राजकीय विकासाचा वेगवेगळ्या प्रकारे विचार केला जाऊ शकतो. कोणत्याही समाजाचे राजकारण ज्या एका राजकीय व्यवस्थेच्या चौकटीत घडते त्या संदर्भातही राजकीय प्रक्रियांचा वेध घेणे आवश्यक ठरते. भारताच्या राजकारणात महाराष्ट्राची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक. आर्थिक. सांस्कृतिक परिस्थितीत परिवर्तने झाल्याने राजकीय पक्षांमध्ये प्रचंड घडामोडी घडल्याने महाराष्ट्रातील राजकारण बदलले आहे. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. या बदलाचा मागोवा घेऊन बदलामागील कारणे व या बदलाचा महाराष्ट्रातील इतर घटकांवर झालेला प्रभाव अभ्यासणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाचा मागोवा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

महाराष्ट्राने अनेक पेज प्रसंगावर आजपर्यंत मात केली आहे. तीव्र संघर्ष करून ' संयुक्त महाराष्ट्र' मराठी भाषिकांनी मिळवला आहे. सध्या जरी महाराष्ट्राची गाडी भरकटली असली तरी आजही सुजाण नागरिक, कार्यकर्ते ,संघटना महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणावर लक्ष ठेवून आहेत. ते मूल्यात्मक राजकारणाचा आग्रह धरून आहेत. अशी माणसे हीच उद्याच्या बळकट महाराष्ट्राचा आधार आहेत.

**संकेत शब्द:-** महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, राजकारण ,जमातवाद, राजकीय पक्ष ,विरोधी पक्ष, शासन, समाज, परिवर्तनवाद ,जात, धर्म,भाषा ,अतिसामान्यकरण ,राजकीयकरण,लोकशाही,निवडणुका. राजकीय प्रतिनिधित्व, मतदार वर्तवणूक, प्रादेशिक पक्ष, विचारप्रणाली, संघटन,

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1960 साली झाली. म्हणून 1960 नंतरच्या घडामोडींना एक समान राजकीय चौकट आहे. पण त्यापूर्वीच्या काळातील अनेक विचार प्रवाह आणि घडामोडी यांचा प्रभाव साठ नंतरच्या राजकारणावर आढळतो.19 व्या शतकातील सुधारणा चळवळ आणि महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेली जातीविरोधी चळवळ यांचा महाराष्ट्रातील राजकीय जीवनावर मोठा परिणाम झाला. महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ ,शाहू महाराजांच्या पुढाकाराने सुरू झालेली ब्राह्मणोउत्तर चळवळ हे केवळ वैचारिक हस्तक्षेप नव्हते. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या भागांमध्ये ग्रामीण क्षेत्रात या चळवळींचा ठसा उमटला होता. या चळवळीमुळे महाराष्ट्रातील सत्ता स्पर्धेला विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच लोकशाहीवादी परिणाम मिळाले आणि राजकारणाचे सामाजिक चारित्र्य निव्वळ ब्राह्मणी न राहता बहुजातीय बनले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली उभा राहिलेल्या दलित चळवळीतून अनेक कार्यकर्ते पुढे आले आणि त्यांनी सत्तेतील सहभागाचा मुद्दा लावून धरला. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेउत्तर चळवळ आणि दलित चळवळ यामुळे महाराष्ट्रातील उच्च जातीच्या राजकीय वर्चस्वाला व्यावहारिक आणि वैचारिक मर्यादा पडलेल्या दिसतात. महाराष्ट्राचे बदलते राजकारण मांडताना महाराष्ट्राचे राजकारण काँग्रेसच्या वर्चस्वासाठी प्रसिद्ध आहे याची जाण ठेवावी लागते. यशवंतराव चव्हाण यांनी विकसित केलेल्या चौकटीचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ राहिला आहे.

1975 नंतरच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणाची वैशिष्ट्ये बदलत गेली. काँग्रेसच्या वर्चस्वाला तडे गेले आणि चव्हाण प्रणित चौकट ही विस्कळीत झाली. हे राजकीय स्थित्यंतर होत असताना ज्या नव्या शक्ती उदयाला आल्या त्यांचे मुख्य वैशिष्ट्य हेच होते की, त्यांनी जनविरोधी अवकाश जास्त मजबूत बनवले. लोकशाही आणि कल्याणकारी धोरण यांचा पाया विस्तारण्याऐवजी पोखरला जाण्याचा धोकाच महाराष्ट्रातील स्थित्यंतरामधून निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर साठीच्या दशकापासून महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींमध्ये कोणती सूत्रे आढळतात याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**उद्देश :- १)** महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्राच्या पक्ष व्यवस्थेचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्राच्या राजकारणातील पक्षव्यवस्थेचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

४) महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा भारतीय लोकशाही वरील प्रभाव अभ्यासणे.

**महाराष्ट्राचे बदलते राजकारण:-**

**अ) महाराष्ट्राचे राजकारण 1957 ते 1975:-** संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रात बहुविध जातीची एकजूट झाली आणि काँग्रेसच्या विरोधात सर्व पक्षांची ही तात्पुरती एकजूट झाली. या घडामोडींचा राजकारणावर प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही. शिवाय मराठी अस्मिता हा राजकारणातील महत्त्वाचा घटक बनला आणि शिवाजी मराठी भाषा या प्रतीकांच्या आधारे प्रादेशिक अहंकाराची आक्रमक मांडणी त्यावेळी केली गेली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर काँग्रेस विरोधकांची एकजूट मोडून पडली आणि बेळगाव व कारवार यांच्या महाराष्ट्रातील समावेशनाचा प्रश्नही अन निर्णय राहिला. पण भावनिक आव्हानाचा आधार म्हणून प्रादेशिक अभिमानाचा मुद्दा मात्र महाराष्ट्राच्या राजकारणात कायम राहिलेला दिसतो. महाराष्ट्र राज्याची स्थापना 1960 साली झाल्यामुळे तेथूनच राजकारणाचे नवे पर्व सुरू झाले असे मानले जात असले तरी खरे तर 1956 -57 पासूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट उदयाला येत होती.(पळशीकर सुहास, संपादक भोळे भा.ल./बेडगीहाळ किशोर, (26 डिसेंबर 2003) "बदलता महाराष्ट्र", पान नं. 24 व 25). महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाचे सामाजिक व आर्थिक आधार आहेत. शाहू

महाराजांचा क्षत्रियत्वाचा दावा आणि ब्राह्मण इतरांच्या मागासलेपणावर मात करण्यासाठीची ब्राह्मणेतर चळवळ यातून मराठा कुणबी समाजात आत्मभान निर्माण झाले. शिक्षण प्रसार झाला आणि राजकीय महत्त्वकांक्षा उदयाला आल्या ब्राह्मणेतर चळवळीतील एक मोठा गट काँग्रेसमध्ये सामील झाल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचा पाया विस्तारण्यास हातभार लागला.काँग्रेसच्या मार्फत आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे मराठा नेतृत्वाचे प्रयत्न सुरू झाले. चव्हाण यांनी खानदानी मराठा नेतृत्व बाजूला सारून सामान्य मराठा समाजातील कार्यकर्त्यांना सत्तेचा दरवाजा खुला करून दिला. खरे तर काँग्रेसचे वर्चस्व अखिल भारतीय पातळीवर होते. पण महाराष्ट्राच्या संदर्भात काँग्रेस वर्चस्वाची खास वैशिष्ट्य होते. त्यामुळे 1967 साली उत्तर भारतात काँग्रेसच्या वर्चस्वाला धक्के बसू लागले . तरी महाराष्ट्रात 1975 -76 पर्यंत काँग्रेस वर्चस्व अबाधित राहिले. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील काँग्रेसची सत्ता बळकट करण्यावर खूप मोठे योगदान दिले आणि म्हणून अनेक वेळा महाराष्ट्रातील काँग्रेसच्या वर्चस्वाचे वर्णन 'चव्हाण मॉडेल 'असेही केले जाते. 1956- 57 पासून पुढच्या दोन दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसचे जे वर्चस्व निवडणुकीच्या राजकारणात टिकून राहिले त्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची वैचारिक बाजू. काँग्रेसचे राजकारण आणि मराठा समाजाचे पुढारी पण यांचे समर्थन दोन प्रकारांनी करण्यात आले त्या काळात प्रसिद्ध पावलेले दोन शब्द प्रयोग या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत 'बहुजन समाजाची सत्ता' व 'बेरजेचे राजकारण'. बेरजेच्या राजकारणा मुळे वैचारिक भूमिकेचे आकर्षण महाराष्ट्रातील बुद्धिवंत आणि पत्रकार यांना निर्माण झाले. यामुळे शहरी- ग्रामीण ,जात, पक्षांतर्गत गट अशा सर्वच पातळ्यांवर विविध स्पर्धाशील घटकांचा समन्वय साधून राज्याच्या विकासाची हमी देता येईल अशी मानसिकता त्या काळात महाराष्ट्रात मान्य पावली. बहुजन समाजाचे राज्य हा विचार ही महाराष्ट्राच्या मानसिकतेत दीर्घकाळ टिकून राहिलेला दिसतो. महाराष्ट्राची विशिष्ट समाज रचना आणि त्या रचनेचे ऐतिहासिक आकलन यातून बहुजन समाज ही संकल्पना साकारली. व ती महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभावी ठरली.

1957 ते 1975 या कालखंडात महाराष्ट्रात राजकीय स्थित्यंतराचे स्वरूप बदलत गेले. महाराष्ट्रातील मराठा नेतृत्वात फूट पाडण्यात इंदिरा गांधी यांना काही प्रमाणात यश आले. त्यातूनच नवीन नेतृत्व महाराष्ट्रामध्ये उदयाला आले. महाराष्ट्रात बदलते पक्ष राजकारण सुरू झाले. प्रथम इंदिरा काँग्रेसला 1978 ते 80 तर 1980 पासून दीर्घकाळ पवारांच्या अनुयायांना महाराष्ट्रात विरोधी पक्षांच्या भूमिकेतच राहावे लागले. त्यामुळे काँग्रेस विरोधाचे म्हणजे बिगर काँग्रेस वादाचे राजकारण बाजूला पडून नवे राजकीय आकृतीबंध महाराष्ट्रात साकार होत राहिले.

**ब) महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीच्या बहुसंख्यवादाचा पाढाव:-**

राजकारणात होणाऱ्या बदलाच्या बरोबरच विविध समाज घटकांचे परस्पर संबंध आणि राष्ट्रीय कल यातही बदल होत असल्याचे दिसते. 1975-77 पूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणाची सर्व सूत्रे मराठा नेतृत्वाकडे होती. बिगर मराठा जातीच्या महत्त्वकांक्षा मर्यादित होत्या आणि मराठा व इतर बहुजन जातींचा काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा होता. महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक रचनेमुळे येथे अन्य मागास जातीचे म्हणजे ओबीसींचे राजकारण चालवणारी शक्ती उपलब्ध नाही. मराठा कुणबी समाजाखेरीस इतर ब्राह्मणेतर जाती संख्येने कमी आहेत. राज्यभर त्यांना अस्तित्व नाही. शेती व्यवसायात असणाऱ्या काही ओबीसी समाज घटकांनी आपले स्वतंत्र राजकारण उभारण्याचा प्रयत्न 1980 नंतर महाराष्ट्रात केलेला दिसतो. महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख पक्षांना बिगर मराठा नेतृत्वाची दखल घ्यावी लागली त्यामुळे या नेतृत्वाला सर्वच पक्षांमध्ये वावही मिळत गेला. 'काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांवर मराठा नेतृत्वाचा प्रभाव असल्याने व भाजपची फक्त हिंदुत्वावर भर देण्याची नीती असल्याने नव्वदीच्या दशकात ओबीसी समूह शिवसेनेकडे वळला .अर्थात शिवसेनेने ही आपला पक्ष ओबीसीचा हितकरता असल्याचा दावा कधी केला नाही.'(पळशीकर सुहास, संपादक भोळे भा.ल./किशोर बेडकिहाळ, (2003), " बदलता महाराष्ट्र",पान नं.32.) महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळा सुभा न मांडता,सत्ताधारी व प्रचलित पक्षाच्या पंगतीलाच बसण्यात ओबीसी समूह तयार झाल्याने, महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीच्या बहुसंख्यवादाचा पाढाव झालेला दिसतो .

**क) महाराष्ट्रातील बदलते दलित राजकारण:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्रातील दलित चळवळीचा पाया विस्तृत होता. त्यातच दलित साहित्याची चळवळ आणि दलित पँथर यांच्यामुळे दलित राजकारणाचे वैचारिक लढाऊ पण आणखी भक्कम झाले. परंतु रिपब्लिकन पक्षातील फाटाफुटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणे दलित समाजाला शक्य झाले नाही. काँग्रेस बरोबर जाण्याच्या मुद्द्यावरून रिपब्लिकन पक्षात वारंवार मतभेद झाले. महाराष्ट्रातील भाजपच्या शक्तीला थांबवण्यासाठी काँग्रेस बरोबर जाण्याचा निर्णय रिपब्लिकन पक्षांनी घेतला. महाराष्ट्रातील शिवसेना भाजप युतीने रिपब्लिकन पक्षातील मातंग व चर्मकार गटातील नेतृत्वाला आपल्याकडे ओढून घेण्यात यश मिळवले. रिपब्लिकन पक्षातील वारंवार होणाऱ्या फाटा फुटी ला कंटाळलेल्या अनुयायांनी भाजप व शिवसेनेचे मार्ग धरले.2003 मध्ये तर शिवसेनेने "शिवशक्ती भीमशक्ती" अशी घोषणा देऊन महाराष्ट्रातील दलित नेतृत्वातील एक गट आपल्यात सामील करून घेण्यात यश मिळवले. रिपब्लिकन पक्षातील फाटा फूट व दलित नेतृत्वाची राजकीय महत्त्वकांक्षा यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित नेतृत्व अदृश्य होताना दिसते आहे. या घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात रिपब्लिकन पक्ष व त्याचे विविध गट आणखीनच अप्रस्तुत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

'दलित राजकीय पक्ष राज्य संपादन करण्याच्या दृष्टीने दलितांना कृती संघटित करण्याची ऐतिहासिक भूमिका हरवून बसले आहेत. इथे नमूद करण्याजोगी बाब म्हणजे हे पक्ष कार्यकर्ते व पक्ष सदस्यांसाठी उपजीविकेचे साधन बनले आहेत. या पक्षाकडे प्रबळ पक्षाचे

उपांग बनून राहणे किंवा राष्ट्रीय आघाडी राजकारणाचा भाग म्हणून सत्तेचे फायदे मिळवणे याव्यतिरिक्त मुक्तीदायी राजकारणाची दृष्टी नसल्याचे दिसते.'(गोपाळ गुरु, संपादक होरा राजेंद्र/ पळशीकर सुहास, "भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार" (2010), पान नं.248,). बहुजन आणि दलित समाजाच्या दृष्टीने राजकारणात एक महत्त्वाचा संस्थात्मक बदल 90 च्या दशकात महाराष्ट्रात झाला. 73 व्या आणि 74 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण दिल्याने त्याचा परिणाम लगेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिसून येणार होता. म्हणजे हजारो स्थानिक लोकप्रतिनिधी हे आता या वंचित वर्गातून निवडून द्यावे लागणार होते. त्यातून महाराष्ट्रातील सर्वच समूहांमध्ये वेगाने राजकीयीकरण झाले. शेकडो दलित ,आदिवासी ,ओबीसी व स्त्री कार्यकर्ते राजकीय पक्षांकडे सक्रिय सहभागाची नोंद करू लागले. महाराष्ट्रातील दलित नेतृत्वांमध्ये या स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षणामुळे राजकीय आकांक्षाला बळ मिळाले.आरक्षण हे न टाळता येणारी बाब असल्याने,सर्वच राजकीय पक्षांना याची दखल घ्यावी लागली. महाराष्ट्रातील या बदलत्या दलित राजकारणाचा महाराष्ट्रातील राजकारणावर लक्षवेधी परिणाम झाला आहे .

**महाराष्ट्रातील राजकीय पक्ष:-** राजकीय व्यवस्थेमध्ये पक्ष संघटना महत्वाचे कार्य करते. लोकांच्या मनात त्यांच्या न्याय हक्का विषयी जागृती करणे त्यांचे मागण्यात रूपांतर करणे आणि त्यांची क्रमवारी लावून त्याला निवडणुकी सारख्या माध्यमातून समाज मान्यता मिळवून देणे हे महत्त्वाचे कार्य राजकीय पक्ष करतात. पक्षांतर्गत गटबाजी व त्याचे परस्पर काटशह हा पक्ष पद्धतीचा स्थायीभाव आहे.2019 च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये प्रचंड उलथापालक झालेली दिसते. निवडणुकीपूर्वी झालेल्या युती निवडणुकीच्या निकालानंतर टिकू शकला नाहीत. जागावाटपावरून पक्षांमध्ये फुट युतींमध्ये तूट व नवीन पक्षांची समीकरणे महाराष्ट्रात उदयाला आली. या गोष्टीला दोन अडीच वर्ष होतायेत की नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील राजकीय पक्षाने पुन्हा एकदा मूल्यहीन राजकारण केल्याचे दिसले. राजकीय पक्षातील कार्यकर्तेच नाही तर पक्षाचे चिन्ह व पक्षाचे अस्तित्वही प्रश्नांकित करणाऱ्या घटना महाराष्ट्रात घडल्या. त्यामुळे 2024 च्या होणाऱ्या निवडणुकामध्ये महाराष्ट्रात प्रचंड अस्थिरता ,अनिश्चितता निर्माण झाली आहे.महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांच्या इतिहासाला अशा सुडाच्या राजकारणामुळे गालबोट लागेल असा विचार राजकीय विश्लेषकांमार्फत मांडला जात आहे.

विकासाचे मुद्दे राजकारणातून हद्दपार झाल्याने धर्मनिरपेक्ष पक्षाची भूमिकाच महाराष्ट्रात उरली नाही. केवळ हिंदुत्वाच्या राजकारणामुळे वर आलेल्या या पक्षांनी सामान्य लोकांशी नाळ कधी जोडली गेली नाही. सामान्य लोकांनी ही या गोष्टीचा कधी गांभीर्याने विचार केला नाही. महाराष्ट्राची मूळ विचारधारा या धार्मिक राजकारणामुळे लयास गेली. अलीकडच्या काळामध्ये महाराष्ट्रातील निवडणुका या जातीयवादी व धर्मवाद यावर आधारित होऊ लागल्या आहेत. या सर्वांमध्ये आता तरी महाराष्ट्रातील जनतेने राजकारणा मागील हे सत्य जाणून घेतले पाहिजे. महाराष्ट्राचे बदलते हे रूप महाराष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण करणारे आहे का ते येणारा काळ ठरवेल. सत्ता स्थापनेसाठी व मुख्यमंत्री पदासाठी शिवसेनेने आपली विचारधारा बाजूला ठेवून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत युती करून सरकार स्थापन केले. त्यांना शह देण्यासाठी बीजेपी ने शिवसेनेमध्ये व राष्ट्रवादीमध्ये फूट पाडून पुन्हा सत्ता स्थापन केली. कदाचित पुढच्या निवडणुकीमध्ये भाजपला बहुमत मिळवणे कठीणही जाऊ शकते. अशी अपेक्षा ठेवली तर वावगे ठरणार नाही, कारण महाराष्ट्रातील जनसामान्य पुन्हा धर्मनिरपेक्षतेच्या दिशेने जाण्याची सुरुवात करत आहेत. महाराष्ट्राच्या सुरुवातीच्या काळात विकास ,उद्योग, शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर निवडणुका होत होत्या तोच काळ पुन्हा महाराष्ट्रात यावा ही अपेक्षा.

**महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा भारतीय लोकशाही वरील प्रभाव :-** महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा भारतीय लोकशाही वर काय प्रभाव पडला याचाही विचार करणे गरजेचे आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेपुढे आज असणारी आव्हाने ही 'आतून' निर्माण झालेली आहेत. लोकशाही समाज जीवन राज्यव्यवस्थेच्या हस्तक्षेपा शिवायच्या लोकशाही व्यवस्थांची स्वायत्तता, विविध घटकांच्या आकांक्षांची दखल घेऊन त्यांचा लोकशाही प्रक्रियेतील निर्णयात्मक सहभाग आणखी वाढविणे, सुदृढ नागरी समाजाची निर्मिती व संवर्धन करणे हा राजकीय प्रभाव तर आर्थिक विकासाद्वारा दारिद्र्य निर्मूलन व अर्थपूर्ण रोजगार निर्मितीचे आवाहन निर्माण झाले आहे. भारतीय राष्ट्राचे धर्मनिरपेक्ष स्वरूप टिकून, समूहांना व्यापक भारतीयत्वाची ओळख देणारा 'बहुजनलक्षी' राष्ट्रवाद रुजविणे, प्रादेशिक आकांक्षा लक्षात घेऊन संघराज्य राज्यकारभार राबविणे जिकरीचे झाले आहे.

घटनात्मक बांधिलकी प्रत्यक्षात आणण्यासाठी सुयोग्य अशा प्रशासकीय यंत्रणेचा स्वीकार भारतीय व्यवस्थेने केला, परंतु त्याचे स्वरूप स्थिर ठेवणे व नोकरशाहीची तटस्थता जपणे या महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणात आव्हान ठरत आहे. लोकशाहीत केवळ आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करून चालत नाही. त्याबरोबर राजकीय, सामाजिक विकासाचेही धोरण समांतर पातळीवर राबवणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा आणखी एक प्रभाव म्हणजे लोकशाही राज्याच्या आदीमान्यतेचा निर्माता असणाऱ्या वर्चस्वशाली शेतीवर्गाच्या ध्रुवीनीकरणाचा पाढाव झाला आहे. अनेक वर्ष भारतीय राजकारणाच्या स्वरूपातील उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष सहमतीतील पोकळपणा उघडा पडला आहे. समाज परिवर्तनाच्या जनकल्याणासाठी उपयुक्त ठरेल अशा अवकाशाचा क्षेत्राचा अभाव असल्याने शोषणाविरुद्ध लढा दाबले जाण्याचा धोका भारतीय लोकशाहीत व महाराष्ट्राच्या राजकारणात वाढला आहे.

**निष्कर्ष:-**

1) महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाच्या आभ्यासांती असे लक्षात आले कि ,विविध पक्ष सत्तेत असल्याने आर्थिक विकास, सामाजिक न्यायबद्दलच्या धोरणातील विविधता महाराष्ट्रात नवे प्रश्न निर्माण करत आहे. राज्यकारभार निर्वेधपणे ,यशस्वीरित्या होणे हीच एक गोष्ट आज पेचात सापडलेली दिसते आहे.

2) महाराष्ट्राच्या पक्षव्यवस्थेच्या आभ्यासावरून असा निष्कर्ष काढता यईल कि , राजकीय पक्ष व समाज यांच्या विविध संबंधातील तणावात्मक तेचामुळे प्रशासनाचे राजकीयकरण आणि राजकारणाचे अतिसामान्यकरण झाल्याचे दिसते आहे. त्यामुळे स्थिर व दूरदर्शी राजकीय निर्णय घेण्याऐवजी तात्कालिक व सत्तेच्या लाभावर नजर ठेवून विविध प्रकारचे असंतोष काबूत आणण्याकरता लोकरंजनवादी धोरणे अवलमताना व राज्यसंस्थेच्या दमणयंत्रणेचा वाढता वापर करताना महाराष्ट्रातील राजकीय पक्ष व्यवस्था दिसत आहे.

3) महाराष्ट्रात घटनात्मक मूल्य विरहित राजकारण वाढले आहे. महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या मनात राजकीय पक्षाच्या विश्वासहारतेबद्दल प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे.

4) महाराष्ट्रच्या राजकारणात राजकीय पक्षाचा विचारधारा व पक्ष व्यवस्थेत बदल होत आहे. महाराष्ट्रच्या राजकीय व्यवस्थेपुढील आजचा प्रश्न राज्यसंस्थेच्या दुर्बलल्याचा नसून केंद्रभूत राज्यसंस्थेला आवर घालण्याचा आहे. हा प्रश्न विविध जनसमुहाच्या लोकशाहीकरण्याचा किंवा त्यांच्या राजकीय सहभागाचा नसून जागृत झालेल्या समूहाचा सामाजिक परिवर्तनाची शक्ती म्हणून सुयोग्य वापर करण्याचा आहे.

**5)** महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा भारतीय लोकशाही वर प्रभाव पडला आहे. .विविधतांचे स्वागत करणाऱ्या व त्याबरोबर वंचित उपेक्षित लोकांची शक्ती वाढवणाऱ्या अवकाशाचा शोध हेच व्यवहारलक्षी, चिकित्सक सामाजिक शास्त्रा पुढचे कार्य आहे. या मार्फतच महाराष्ट्राच्या राजकारणातील वसाहतवादी, अनुभववादी धोरणांना यशस्वीपणे खोडून काढता येईल.

- **संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. भोळे भा.ल,( जून 2008), “भारताचे शासन आणि राजकारण”, पिंपळपुरे अँड. कंपनी पब्लिशर, नागपूर.
2. घागरेकर,(2011), “भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण”,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर
3. भोळे भा.ल.,बेडगिहाळ किशोर,(26डिसेंबर2003),“बदलता महाराष्ट्र”,आंबेडकर अकादमी ,सातारा , पान नं. 21ते34
4. नांदेडकर व .गो,( 2011),“भारतीय राज्यघटना आणि व्यवहार”, डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान नं. 175 ते 185

5)होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, (2010),“भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार”, डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान नं. 248 ते 257

6)मोरडेकर माधव, (अरुण शौरी), (1994).”भारताचे भवितव्य”, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

7) आवारी विलास, देवरे सुरेश,(सप्टेंबर,2011), “आधुनिक राजकीय विश्लेषण”, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

8) कुलकर्णी बी. वाय., (जून, 2013), “भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया”,एज्युकेशनल पब्लिशियल ,औरंगाबाद .

9) केळकर भारती,( 2013), “भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला”, डायमंड पब्लिकेशन, पुणे,

10) प्रकाश बाळ/ बेडगिहाळ किशोर (2002),”भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रिया आणि स्वरूप”, आंबेडकर अकादमी सातारा. पान नं.128

11) मराठी विश्वकोष, खंड 14. पान नं. 660

12) https://newsuncut.tv/purogami-maharashtrache-badalte-rajkaran/